चौकशी समितीचा अहवाल सादर

मुंबई । प्रतिनिधी

घाटकोपर येथे बेकायदा महाकाय फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करणाऱ्या माजी मुख्य न्यायाधीश दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखालील समितीने बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आपला सीलबंद अहवाल सादर केला. समितीने चौकशी सोबतच महाकाय फलकाच्या संदर्भात महत्वाच्या उपाययोजना सरकारला सुचवल्या आहेत.

१३ मे २०२४ रोजी घाटकोपरच्या छेडानगर परिसरात बेकायदा महाकाय फलक कोसळून १६ निष्पाप नागरिकांचा बळी गेला होता. या दुर्घटनेनंतर शहरातील जाहिरात फलक आणि त्यांची कायदेशीरता याबाबत प्रश्न निर्माण झाले होते. राज्य सरकारने या घटनेची चौकशी

घाटकोपर फलक दुर्घटना

करण्यासाठी १० जून २०२४ च्या निर्णयान्वये चौकशी समिती गठीत केली होती. या समितीला अहवाल सादर करण्यासाठी एक महिन्याची मुदत देण्यात आली होती. त्यानंतर अंतिम अहवाल सादर करण्यासाठी ३१ मार्च २०२५ पर्यंतची मुदत देण्यात आली होती.

या समितीत सदस्य म्हणून मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त, पोलीस महासंचालकांच्या कार्यालयातील अतिरिक्त पोलीस महासंचालक श्रेणीपेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी, आयआयटी मुंबईचे बाह्य संरचनेच्या सुरक्षेचे मूल्यांकन करण्याचा अनुभव असलेले स्ट्रक्चरल अभियंता, आर्थिक अनियमितता आणि कर चुकवेगिरीचा तपास करण्याचा अनुभव असलेला आयकर अधिकारी, आर्थिक तपास आणि लेखा परीक्षणात निपुण असलेले सनदी लेखाकार यांचा समावेश करण्यात आला होता.

महाकाय फलक दुर्घटना, तिची कारणे आणि परिणाम यांचा क्रम तपासण्यास समितीला सांगण्यात आले होते. भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी पोलिसांच्या, रेल्वे पोलिसांच्या जमिनीवरील जाहिरात फलक उभारण्याविषयीच्या धोरणाबाबत शिफारस करण्याची सूचना समितीला करण्यात आली होती. घाटकोपरमध्ये महाकाय फलक उभारण्याची परवानगी देताना अटी, शर्तीचे उल्लंघन कसे झाले याचीही चौकशी या समितीने केली आहे. या समितीने नेमक्या काय शिफारशी केल्या आहेत, याची स्पष्टता लवकरच सरकारकडून केली जाण्याची शक्यता आहे.

ग्रामपंचायत हद्दीतील होर्डिंग्ज परवानगी धोरणासाठी तज्ज्ञ समिती गठीत

मुंबई । प्रतिनिधी

ग्रामपंचायत हद्दीत जाहिरात फलक किंवा होर्डिंग्ज लावण्याबाबत कोणतेही अधिकार नसल्याने ग्रामविकास विभागाने पंचायत राज विभागाचे संचालक यांच्या अध्यक्षतेखाली सात जणांची तज्ज्ञ समिती नेमली आहे. ही समिती इतर राज्यातील ग्रामपंचायतीच्या हद्दीतील होर्डिंग्जच्या परवानगीबाबतचे धोरण, नियम-अधिनियमातील तरतुदी आणि त्यांची अंमलबजावणी याबाबतचा अभ्यास करून सरकारला एक महिन्याच्या आत अहवाल देणार आहे.

शहरी, निमशहरी भागात जाहिरात आणि होर्डिंग्ज लावण्याबाबत नगर विकास, सार्वजनिक बांधकाम विभागाचे धोरण यापूर्वीच जारी केले आहे. मात्र, सद्यस्थितीत ग्रामपंचायतीला अशाप्रकारे परवानगी देणारे कोणतीही तरतूद किंवा अधिकार नाहीत. जाहिरात फलक वा होर्डिंग लावण्यास विहीत पद्धतीने परवानगी देणारे अधिकार मिळाल्यास ग्रामपंचायतीला उत्पन्नाचा स्रोत मिळू शकतो. त्यासंदर्भात ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ग्रामपंचायतीला जाहिरात फलक, होर्डिंग लावण्याबाबत परवानगीचे धोरण, नियम करण्यासाठी तज्ज्ञ समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार पंचायत राज विभागाचे संचालक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. याबाबतचा शासन निर्णय मंगळवारी जारी करण्यात आला.

या समितीमध्ये पंचायत विभागाचे उपायुक्त (पुणे), ग्रामविकास विभागाचे सहसचिव, पंतप्रधान ग्रामसडक योजनेचे अधीक्षक अभियंता, पुणे जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता, पुणे (मांजरी) येथील ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य राहुल काळभोर यांचा सदस्य म्हणून तर सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे हे सदस्य सचिव म्हणून समावेश करण्यात आला आहे. ही समिती इतर राज्यातील ग्रामपंचायतीला होर्डिंग्ज वा जाहिरात फलकाच्या परवानगीतून मिळणारा महसूल, त्याचे नियमन, परवानगी वा ना-हरकत देण्याची कार्यपद्धती, दुर्घटना झाल्यास त्याबाबत जाहिरात संस्थांची जबाबदारी, जाहिराती प्रसिद्ध करण्याबाबतचे निकष आदी गोष्टींचा अभ्यास करून एक महिन्याच्या आत आपला अहवाल सरकारला देणार आहे.

नाशिकमध्ये सतर्कता

पाकिस्तानवर एअर स्ट्राईक; देवळाली, नोटप्रेस, ओझर येथे खबरदारी

नाशिक । प्रतिनिधी

भारतीय वायूसेनेने पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर हवाई हल्ला केल्यानंतर संपूर्ण देशात सतर्कता बाळगली जात आहे. त्यानुसार शहरातीलही संवेदनशील ठिकाणांवर सुरक्षितेच्या दृष्टीकोनातून खबरदारी बागळली जात आहे. देवळाली कॅम्प येथील आर्टिलरी सेंटर, कॅटस् (गांधीनगर) चलार्थपत्र मुद्रणालय (नोटप्रेस,) ओझर येथील एचएएलसह एअरपोर्ट व शहरातील महत्वाची धार्मिक स्थळांभोवतीच्या सुरक्षिततेचा आढावा घेतला जात आहे. पोलिसांनीही खबरदारी म्हणून शहरातील हॉटेल, लॉजमध्ये नियमीत तपासणी मोहिम राबवली.

पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केल्याने भारतानेही याचे प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानमधील दहशतवादी ठिकाणांवर क्षेपणास्त्र हल्ले केले. त्यानंतर सीमावर्ती भागातही पाकिस्तानकडून गोळीबार झाल्याने दहा नागरिकांचा मृत्यू झाला आहे. या घटनांमुळे युद्धजन्य परिस्थिती उद्भवण्याची शक्यता निर्माण झाल्याने देशभरात खबरदारी घेतली जात आहे. अचानक हल्ला झाल्यास किंवा घातपाताचा प्रकार रोखण्यासाठी देशभरातील संवेदनशील ठिकाणांवर बंदोबस्त सतर्क केला आहे. त्यानुसार शहरातही बंदोबस्त वाढवला आहे. कोणताही अनूचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी गस्त वाढवली आहे. तसेच शहरातील हॉटेल, लॉज, धर्मशाळा येथे थांबणाऱ्या व्यक्तींची तपासणी केली जात आहे. तसेच गर्दीच्या ठिकाणांसह महत्वाच्या ठिकाणी श्वान पथकामार्फत तपासणी केली जात आहे. त्याचप्रमाणे रेकॉर्डवरील गुन्हेगारांवरही नियमित कारवाई सुरु असून शहरात नव्याने दाखल झालेल्या नागरिकांचीही माहिती घेतली जात आहे.

पान १ वरून...

बदला घेतला; पाकवर डागली २४ क्षेपणास्त्रे

काळजी घेण्यात आली. मार्च २०२५ मध्ये जम्मू आणि काश्मीरमधील चार जवानांची हत्या करण्यात आली होती. मुंबई दहशतवादी हल्ल्यात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांच्या लपण्याच्या ठिकाणांनाही लक्ष्य करण्यात आले आहे. मरकज सुभानल्लाह हे जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय होते. येथे दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले जात असे. कोणत्याही लष्करी ठिकाणाला लक्ष्य करण्यात आले नाही आणि नागरिकांची जीवितहानी झाली नाही. यावेळी त्यांनी टार्गेट असलेली आणि ती ठिकाणे उद्ध्वस्त झाल्याचे फोटो देखील दाखवले.

नाशिकवर चार बॉम्ब डागले

काकड, योगेंद्र पाटील, मनोहर जगताप, शुभम क्षीरसागर, मुख्य अग्निशमन अधिकारी संजय बैरागी, घटना नियंत्रण अधिकारी योगेंद्र पाटील, पोलीस निरीक्षक संतोष बावरूकर उपस्थित होते. जिल्हाधिकारी कार्यालयास एअर फोर्सवरून संदेश प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय व एअर रेड झालेल्या मॉक ड्रिलच्या ठिकाणी सायरन वाजवण्यात येवून त्यांची कार्यक्षमता तपासण्यात आली. त्यानंतर आग लागलेल्या ठिकाणाहून जखमींना सुरक्षितरित्या बाहेर काढून रूग्णवाहिकेपर्यंत पोहचविणे, अग्निशमन दलाद्वारे आगीवर नियंत्रण मिळविणे, जखमींना प्रथमोपचार देणे हा सर्व मॉक ड्रीलचा सराव ३० मिनिटात पूर्ण झाला. दरम्यान, यात काहीअंशी त्रुटी आढळल्याने त्यावर योग्य ती कार्यवाही केली जाणार आहे.

'ऑपरेशन सिंदूर' नाव का दिले?

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिलला झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भरतीयांसह जगभरात संतापाची लाट पसरली होती. या दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २५ भारतीय आणि एका नेपाळी नागरिकांचा मृत्यू झाला होता. मात्र या भ्याड हल्ल्यातील सर्वात भयावह गोष्ट म्हणजे दहशतवाद्यांनी सामान्य पर्यटकांना लक्ष्य केले. सोबतच पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून गोळी झाडली आहे. या कृत्याने नक्कीच एक गोष्ट अधोरेखित केली जात आहे ती म्हणजे हा हल्ला केवळ देशावर नाही तर त्यामागे धार्मिक आणि देशाच्या एकात्मतेवर ही हल्ला असल्याचे बोलले जात आहे. या भ्याड हल्ल्यावेळी महिलांचे कुंकू म्हणजे त्यांच्या पर्तीना लक्ष्य करण्यात आले. दहशतवाद्यांचा हेतू केवळ त्यांना जिवानिशी मारण्याचाच नव्हता, तर भारतीय संस्कृती, देशातील एकता आणि देशाच्या आत्म्यावर हल्ला करण्याचा होता. त्यामुळे अनेक निष्पापांचे कुंकू पुसल्या गेलेल्या पीडित कुटुंबीयांना काही अंशी न्याय देण्याच्या हेतूने या मोहिमेला 'ऑपरेशन सिंदूर' असे नाव देण्यात आल्याचे बोलले जात आहे.

पाकच्या बदला घेण्याच्या वल्गना

पहलगाममधल्या दहशतवादी हल्ल्याला भारताने दिलेला प्रतिसाद 'तात्पुरता आनंद' असल्याची प्रतिक्रिया लेफ्टनेंट जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी दिली आहे. त्यात ते पुढे म्हणाले की 'याचा बदला कायमस्वरूपाच्या दुःखाने घेतला जाईल. त्यांच्या अधिकृत निवेदनात पुढे म्हटले आहे की, पाकिस्तान स्वतःच्या वेळेनुसार आणि ठरवलेल्या ठिकाणी या हल्ल्याला प्रत्युत्तर देईल आणि भारताच्या हल्ल्याचा संदर्भ देत ते पुढे म्हणाले की, या हल्ल्याला 'अनुत्तरीत सोडले जाणार नाही.भारताने तीन ठिकाणी हवाई हल्ले केले आहेत. बहावलपूर, कोटली आणि मुझफ्फराबाद... पाकिस्तानी हवाई दलाची सर्व विमाने हवाई हल्ले करत आहेत. सर्व हल्ले भारताने स्वतःच्या हवाई हद्दीतून केले आहेत. असे आयएसपीआरच्या निवेदनात पुढे म्हटले आहे. पाकिस्तान स्वतःच्या निवडीच्या वेळी आणि ठिकाणी त्याचे उत्तर देईल. ते अनुत्तरीत राहणार नाही. भारताच्या तात्पुरत्या आनंदाची जागा सततच्या दुःखाने घेतली जाईल,असे त्यात म्हटले आहे.

ऑपरेशन सिंदूरनंतर समाज माध्यमांवर मिम्सचा पाऊस



मानवता कॅन्सर सेंटरमध्ये मायक्रोबायोलॉजी विभागाचे उद्घाटन

नाशिक । एचसीजी मानवता कॅन्सर सेंटरमध्ये अत्याधुनिक मायक्रोबायोलॉजी विभागाचे उद्घाटन करण्यात आले. यानंतर ६ वी फ्रन्टियर्स इन ऑन्को सर्जरी कॉन्फरन्स झाली.

याप्रसंगी केंद्रीय आयुष राज्यमंत्री व आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव उपस्थित होते. कॅन्सर सेंटर, किम्स मानवता हॉस्पिटल्स आणि सिक्स सिग्मा हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. राज नगरकर यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केल. प्रार्थना नगरकर, डॉ. सुचित गंधे, डॉ. कुमुदिता सोनवणे, माजी खासदार हेमंत

गोडसे, डॉ. विरेंन नगरकर, डॉ. कुमुदिता सोनवणे यावेळी उपस्थित होते. ३५० हून अधिक प्रतिनिधी आणि ८५ आंतरराष्ट्रीय वक्ते कार्यक्रमास सहभागी झाले होते.

एचडीएफसी फंडाची प्रभावी गुंतवणूक

मुंबई । एचडीएफसी फ्लेक्सी कॅप फंड ही लार्ज कॅप, मिड कॅप आणि स्मॉल कॅप समभागांमध्ये गुंतवणूक करणारी एक इक्विटी योजना आहे. या योजनेने गुंतवणूकदारांसाठी दीर्घकालीन संपत्ती निर्माण केली आहे. स्थापनेपासून या फंडाने ३१ मार्च २०२५ पर्यंत १८.८ टक्के वार्षिक सरासरी संमिश्र वाढ नोंदवली आहे. मागील तीन दशकांमध्ये या फंडाने अनेक अडथळ्यांचा यशस्वीपणे सामना करत मजबूत मूलभूत तत्वांवर आधारित गुणवत्तापूर्ण कंपन्यांमध्ये दीर्घकालीन वाढीची क्षमता पाहणारी गुंतवणूक प्रभावीपणे सादर केली आहे.

मातोरीच्या बैलजोडीला संत निवृत्तिनाथांच्या पालखी रथाचा मान

नाशिक । वारकरी संप्रदायाचे आद्यगुरू संतश्रेष्ठ निवृत्तिनाथ महाराजांच्या पालखीचे आषाढी वारीसाठी १० जून रोजी त्र्यंबकेश्वरहून प्रस्थान होणार आहे. या पालखी सोहळ्यातील रथाचे सारथ्य मातोरी येथील बैलजोडी करणार असून, इतरही दोन गावातील बैलजोडींना यंदाच्या पालखी सोहळ्याचे सारथ्य करण्याची संधी मिळाली आहे.

या निमित्ताने मातोरी ग्रामस्थांनी नुकतेच सप्तशृंगगड येथे बैलजोडीची विधिवत पूजा केली. सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट या विश्वस्त संस्थेच्या वतीने मातोरीकरांचे प्रतिनिधी किरण कानड व बैलजोडीचे मालक गोकुळ धोंडगे यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुदर्शन दहातोंडे, कार्यकारी अधिकारी भगवान नेरकर, जनसंपर्क अधिकारी भिकन वाबळे, शिवाजी पिंगळे आदी उपस्थित होते.

अविवा इन्शुरन्सचा गौरव

मुंबई । टीआरएच्या ब्रँड ट्रस्ट रिपोर्टकडून सलग सातव्या वर्षी भारतातील सर्वात विश्वासार्ह प्रायव्हेट लाइफ इन्शुरन्स ब्रँड म्हणून अविवा लाइफ इन्शुरन्सचा गौरव करण्यात आला आहे. खासगी जीवनविमा क्षेत्रात आपले नेतृत्व आणखी सक्षम करत असताना अविवा इंडियाने आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ३० दिवसांत १०० टक्के क्लेम सेटलमेंट करून सर्वोत्तम क्लेम सेटलमेंट टर्नअराऊंड साध्य केल्याचे मुख्य विपणन अधिकारी विनित कपाही यांनी सांगितले. कंपनी लाइफ इन्शुरन्सच्या क्षेत्राची व्याख्या नव्याने करण्यावर भर देत असून, ग्राहकांना सकारात्मक उपाययोजना, आरोग्यासंबंधी माहिती आणि वैयक्तिक मार्गदर्शन देऊन त्यांना अधिक सुदृढ आणि संपूर्ण आयुष्य जगण्यास मदत करण्यात येत असल्याचे कपाही यांनी सांगितले.

मणिपाल हॉस्पिटल्समध्ये सर्जिकल रोबोटिक सिस्टमचे उद्घाटन

पुणे । मल्टिस्पेशॅलिटी सर्जरीज मध्ये दि एसएसआय मंत्रा सर्जिकल रोबोटिक सिस्टम या अत्याधुनिक अशा पध्दतींची सुरुवात प्रथमच बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटलमध्ये करण्यात आली आहे.

यामुळे रुग्णसेवा विभागात आणखी एक आधुनिक पध्दतीची सुरुवात झाली आहे. नवीन पध्दतीमुळे हॉस्पिटलकडून आता अगदी अचूक आणि मिनिमली इन्व्हेझिव्ह शस्त्रक्रिया करता येणार आहेत. यामुळे कार्डिॲक थोरॅसिस, ऑन्कोलॉजी, युरोलॉजी, गायनॅकोलॉजी आणि जनरल सर्जरी क्षेत्रात नवीन क्रांती झाली आहे.

आरोग्य तपासणी शिबिर

नाशिक । के. के. वाघ शिक्षण संस्था, के. के. वाघ फाउंडेशन, श्री बाळासाहेब वाघ वेल्फेअर फाउंडेशन आणि स्माईल व स्पिनॅल संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मोफत हृदय, नेत्र व महिला आरोग्य तपासणी शिबिर नुकतेच कर्मवीर रावसाहेब थोरात माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मौजे सुकेणे येथे पार पडले. ३५० हून अधिक ग्रामस्थांनी मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.

प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ.हिरालाल पवार, डॉ. प्राची पवार आणि नामको चॅरिटेबल ट्रस्टच्या डॉक्टरांनी रुग्णतपासणी करत वैद्यकीय सल्ला दिला. याप्रसंगी विश्वस्त शकुंतला वाघ, मविप्र उपसभापती डी.बी. मोगल, निसाकाचे माजी संचालक बाळासाहेब जाधव, आनंदराव बोरडे, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, मविप्र सदस्य प्रतापराव मोगल, सरपंच आनंदराव भंडारे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रा. पी. पी.आहेर, प्रा.आर.बी. पोटे, प्रा. पूनम हळदे, प्रा.पल्लवी कदम, प्रा. रेश्मा कडाळे, प्रा.अक्षदा गायकवाड आदींनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

रोशन पिता-पुत्र पडद्यावर एकत्र

मुंबई । एक्सॉनमोबिल ल्युब्रिकण्ट्स प्रा. लि. या भारतातील मोबिल ब्रॅण्डेड ल्युब्रिकण्ट्सची विक्री करणाऱ्या एक्सॉनमोबिल सहयोगी कंपनीने 'अनफॅथेव्हल जर्नी' ही मोहीम सुरु केली आहे. याचाच एक भाग म्हणून कंपनीने नव्या जाहिरातीचे नुकतेच अनावरण केले. जाहिरातीमध्ये सिन्थेटिक इंजिन ऑईल ब्रँड मोबिल १ वर विशेष प्रकाश टाकण्यात आला आहे. बॉलिवुड अभिनेता हृतिक रोशन व त्याचे वडील प्रसिद्ध चित्रपट निर्माते तथा दिग्दर्शक राकेश रोशन पहिल्यांदाच पडद्यावर एकत्र आले आहेत.

कसोटी क्रिकेटमधून रोहित शर्माची निवृत्ती

मुंबई । वृत्तसंस्था

भारतीय संघाचा नियमित कर्णधार रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. रोहित शर्माने इंस्टाग्रामवर एक स्टोरी शेअर करून ही माहिती दिली आहे. रोहितने त्याच्या पोस्टमध्ये लोकांच्या प्रेमाबद्दल आभार मानले आहेत. रोहित शर्माच्या घोषणेनंतर इंग्लंड दौऱ्यावर भारतीय संघाला नवीन कसोटी कर्णधार मिळणार हे स्पष्ट झाले आहे. या शर्यतीत जसप्रीत बुमराह, केएल राहुल, शुभमन गिल आणि ऋषभ पंत आघाडीवर आहेत.

कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा करताना रोहित शर्माने त्याच्या इंस्टाग्रामवर एक स्टोरी शेअर केली. 'भारताच्या कसोटी संघाचे प्रतिनिधित्व करणे माझ्यासाठी मोठा सन्मान आहे. गेल्या काही वर्षांपासून मिळालेल्या प्रेम आणि पाठिंब्याबद्दल धन्यवाद. मी एकदिवसीय क्रिकेटमध्ये भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करत राहीन', असे रोहित शर्माने म्हटले. ऑस्ट्रेलियाविरुद्ध बॉर्डर- गावस्कर ट्रॉफीमधील चौथा कसोटी सामना

रोहित शर्माच्या कसोटी कारकिर्दीतील शेवटचा सामना ठरला, जो भारताने गमावला होता. रोहित हा कसोटी क्रिकेटमध्ये भारताचा सर्वात यशस्वी फलंदाज आहे, त्याने ६७ कसोटी सामन्यांमध्ये ४०.५७ च्या सरासरीने १२ शतके आणि १८ अर्धशतकांसह ४ हजार ३०१ धावा केल्या आहेत. रोहितने २४ कसोटी सामन्यात भारताचे नेतृत्व केले. यातील १२ सामने जिंकले आणि नऊ सामन्यात त्याला पराभवाचे तोंड पहावे लागले. इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या मालिकेत रोहित शर्मा भारताचे नेतृत्व करेल, अशी अपेक्षा होती. परंतु त्या मालिकेसाठी संघ जाहीर होण्यापूर्वीच त्याने कसोटी कारकिर्दीला पूर्णविराम लावला. रोहित शर्मा बऱ्याच दिवसांपासून खराब फॉर्मशी झुंजत होता. त्याने १५ कसोटी सामन्यांमध्ये १०.८३ च्या सरासरीने १६४ धावा केल्या. बांगलादेश आणि न्यूझीलंड विरुद्धच्या घरच्या मालिकेतही त्याने निराशाजनक कामगिरी केली.

आनंदी राहण्यासाठी कर्णधारपद सोडले

कोहलीने सोडले मौन

मुंबई । वृत्तसंस्था

स्टार फलंदाज विराट कोहलीने भारतीय संघ आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे कर्णधारपद सोडण्याच्या निर्णयाबद्दल चार वर्षांनंतर आपले मौन सोडले. त्याने जवळपास एक दशक भारतीय संघ आणि आयपीएल फ्रँचायझी आरसीबीचे नेतृत्व केले. कोहलीने सर्वात प्रथम २०२१ मध्ये भारतीय टी-२० संघ आणि त्यानंतर आरसीबीचे कर्णधारपद सोडले. यानंतर त्याला एकदिवसीय कर्णधारपदारूनही काढून टाकले. काही महिन्यांनंतर दक्षिण आफ्रिके विरुद्धच्या पराभवानंतर कोहलीनेही कसोटी कर्णधारपद सोडले.

विराट कोहलीने कर्णधारपद सोडण्याचा निर्णय का घेतला? हे आतापर्यंत कोणालाही माहिती नव्हते. पण आता कोहलीने स्वतः हे गुपित उघड केले. आरसीबी बोल्ड डायरीज पॉडकास्टमध्ये मयंती लँगरशी बोलताना विराट म्हणाला की, माझ्यासाठी कर्णधारपद खूप कठीण झाले. माझ्या कारकिर्दीत मी अशा टप्प्यावर पोहोचलो होतो की, मला क्रिकेटवरही लक्ष केंद्रित करता येत नव्हते. मला खूप संघर्ष करावा लागला. मी नेहमी त्याचाच विचार करायचो. मी २०२२ मध्ये एक महिन्याचा ब्रेक घेतला आणि या काळात बॅटला हातही लावला नाही. त्यावेळी मला असे वाटू लागले की, खेळात स्वतःला टिकवून ठेवण्यासाठी आनंदी राहणे महत्त्वाचे आहे. त्यानंतर मी कर्णधारपदातून मुक्त होण्याचा निर्णय घेतला.

नवी दिल्ली येथे झालेल्या खेलो इंडिया युथ गेम्स २०२५ मध्ये ५० मीटर रायफल ३ पोझिशन्स (युवा महिला) स्पर्धेतील सुवर्णपदक विजेती महाराष्ट्राची प्राची गायकवाड(मध्यभागी), रौप्यपदक विजेती कर्नाटकची तिलोत्तमा (उजवीकडे)आणि कांस्यपदक विजेते कर्नाटकची अनुष्का (डावीकडे).